श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष १७ ] शके १८६२ मार्गशीर्ष. [ अंक ९

बाबा बाबा, निशिदिनिं मना बोल हे बोल बाबा ॥
बाबा नामीं, किर्तिवरी असे दिव्य जादू अबाला ॥



बा बाळिइयें, त्यज शरण जा त्या न भूपा नवाचा ॥
बा बाधा ना, तुज यमपुरीं जावयाची उवाचा ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

संपादक:—रामचंद्र वासुदेव भैसास

# अनुक्रमणिका


बाबा व भिवपुरी वैजनाथ ... ... .... ... ३१९
देहदुर्ग, आरती ( कविता ) ... ... ... ३२०
शिर्डीवृत्त ... ... ... ... ३२१
पुण्यतिथी उत्सव .... ... ... ... ३३१
अनुभव ... ... ... ... [illegible]


## श्रीसाईभक्तांस विनंती

साईलीलेचें वर्ष चैत्र महिन्यापासून सुरू होतें. तरी अंक सुरू करणें आल्यास चैत्रापासून वर्गणीदार झालें पाहिजे.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनी आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चर्ई रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनीं आपलें अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टिपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवून द्यावी. अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल

**रा. वा. वैसास. संपादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २
गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई १४.

---


श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर कृत

**श्री साईनाथ भजन माला**

सुधारून वाढविलेली आवृत्ति

किंमत १। रुपया ट. ह. निराळे

मिळण्याचा पत्ता डॉ. व्ही. रघुनाथ L. M. & S. बांद्रा.



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥

शके १८६२ ) श्रीसद्गुरु साईनाथ ( वर्ष १७ अंक ९

श्री दत्तचित्साइ सद्गुरुभ्योनमः

# बाबा व भिवपुरी वैजनाथ

## आमचा चिमुकला अवघा जातां येतांचा दोन अडिच तासांचा श्री भिवपुरी आग्निरथ प्रवास व तेथील बाबांच्या स्थानाचें तास अर्ध्या तासाचे निरीक्षण

:o:

दिनांक १९–८–३९ रोजी स्थापन झालेल्या " श्री. सद्गुरु साइनाथ सेवा संस्था " भिवपुरी रोड या नांवच्या नूतन संस्थेचा अहवाल व ही संस्था स्थापन होण्याचे पूर्वीची " श्री साइनाथ सेवा मंडळ " ह्या संस्थेची व तिच्या आद्य-तनकत्याची माहिती असे दोन लेख श्री. सा. ली. वर्ष १६ जोड अंक ४–५–६ यांत प्रसिद्ध झाले आहेत. तसेच " भिवपुरी येथील श्री सद्गुरु साइबाबांचे स्थान " या मथळ्याखाली एक लहानसा पण विस्तृत लेख श्री सा. ली. वर्ष १६ जोड अंक १०–११–१२ यांत आला आहे.

यासंबंधीं कांहीं गैरसमज ऐकिवात आल्यावरून हें स्थान तरी काय आहे हें पहा- ण्याची साहाजिकच जिज्ञासा उत्पन्न झाली. व म्हणून मी सहकुटुंब सहपरिवार, श्री. श्री. ना. उर्फ नानासाहेब खारकर शिरडी संस्थान प्र. सचिव व कोषा- ध्यक्ष सहकुटुंब व छोटासा परिवार व श्री गणपतरावजी कारखानीस यांचेसह गेल्या कार्तिक शु. ११ रविवार दि. १०-१२-४० रोजीं सकाळचे ७-५२ च्या कर्जत लोक- लनें ठाण्याहून निघून भिवपुरी रोड स्टेशनवर सवा नवाचे सुमारास पोंचलों. व तेथून तसेंच बाबांच्या स्थानीं गेलों. इतक्यांत म्हणजे सुमारें अर्धा पाऊण तासांत कर्जतहून श्री रामचंद्र वासुदेव पैसास, त्यांचे जामात श्री हरीभाऊ वाटवे, स्नेही प्रभु मास्तर असे तिघेजण तेथें आले. ~~प्रभु मास्तर यांचें अजनांव आहे~~. हें बाबांचें निस्सीम भक्त. हे सेवानिवृत्त असून कर्जत गावींच रहातात. यांचें वय अजमासें ७०-७२ वर्षांचें आहे.

तेथें गेल्यानंतर कै. श्री. केशव रामचंद्र प्रधान यांनीं सुमारें २४-२५ वर्षांपूर्वी बांधलेलें स्वतःचें घर व १९१७ चे सुमारास बांधलेलें बाबांचें मंदीर व केशवरावजींच्या जामातांनी ( श्री वामनराव उर्फ बापूराव गुप्ते ) बांधलेलें घर व भात जमीन पाहिली. केशवरावजींचें घर लहानसें टुमदार, एक मजली, स्वच्छ, साधे, आल्हाददायी दिसले. हवा थंड, व मजेदार वाटली. प्रथम बाबांचे मंदिरांत बाबांची आरती झाल्यावर अंगत पंगत वजा हरि दिनींचा यथेच्छ फराळ झाला. दोन्ही जागा रम्य भासल्या. फराळ व आरती यांचें दरम्यानचें वेळांत त्या स्थलांचे शक्य तितकें निरिक्षण केलें.

घर खेडेगावीं थाटाचें पण मजबूत आहे. या घरापासुन ३-४ हातावर बाबांचे मंदीर आहे. तें ही असेंच लहानसें आहे. चारी बाजुस एक विटेच्या पडध्या वजा मातीच्या भिंती आहेत. मध्यें मध्यें खिडक्या दरवाजे आहेत. पुढें मोठा दरवाजा आहे पण त्यास दारें नाहींत, खुलाच आहे. मंदिरांत गाभारा आहे. त्यास पुढचे बाजुस लांकडी जाळी बसविली असून दरवाजा ठेविला आहे. गाभाऱ्यांत सुमारें २ फूट उंचीवर बाबांची लहानशी ८-९ इंच उंचीची प्लास्टरची चल मूर्ती ठेविली आहे. व तिला दोन फूट उंचीच्या साध्या लांकडी देव्हाऱ्याच्या आकाराची चौकट बसविली आहे. गाभाऱ्या भोंवतीं प्रदक्षिणा घालण्यास अकुंचित जागा ठेविली असून प्रदक्षिणेचे वाटेवर मागचे बाजुस उजेडाकरितां एक लहानशी खिडकी ठेविली आहे. गाभाऱ्याचा पुढील भाग तब- कडी वजा तयार केला असून त्यावर महिला मंडळींना बसण्याची योजना केली आहे. एकंदरीत मंदिरांत खालीं व वर मिळून ५०-७५ मंडळी बसतील इतकीच जागा आहे. घरावर व मंदिरावर पूर्वीच्या जुन्या चालीची नळीची कौले घातली आहेत. मंदिराचे

ांकुड काम नवें आहे पण फारच बारीक आहे. पाया व जोते कचे असलेमुळें मंदि-राच्या भिंती फार दिवस टिकाव धरतील असें दिसत नाहीं.

घर व मंदीर यांचेमध्यें मातीचेंच एक लहानसें २||-३ फूट उंचीचें तुळशी ंदावन आहे. त्यांत कितीही वेळां तुळसीचें रोप लाविलें तरी तें जगत नाहीं असें प्रधानांच्या घरचीं मंडळी सांगतात.

मंदीराचें शेजारीं गडी मनुष्य राहणें करतां एक लहानसे बिन कौलारू रिकामें झोंपडें आहे. हल्ली त्यांत कोणी रहात नाहीं.

रहातें घर, मंदीर, व रिकामें घर यांचे भोंवती एक लहानसें झाडांचें आवार आहे. या आवारांत चार बाजूस चार वृक्ष आहेत. एक अश्वत्थ जोडवृक्ष. एक वटवृक्ष व दोन लिंबवृक्ष. तसेंच मंदीर व रिकामें झोंपडें यांचेमध्यें एक लहानसा बाल औदुंबर वृक्ष आहे.

रिकामे घराजवळील आवाराबाहेर थोडीशी खडकाळ व खुली जागा आहे. ती प्रधानांच्याच मालकीची आहे. आवाराच्या आंतील व बाहेरील मिळून सर्व क्षेत्र अजमासे अर्धे एकराचे आंतच भरेल.

राहते घराच्या कुंपणाच्या मागे १५।२० हातावर एक पाण्याची लहानशी दगडी विहीर आहे. यांतील पाणी उन्हाळ्यापर्यंत पुरतें. पुढें मैल दोन मैलांवर नदी आहे तिचें पाणी आणावें लागतें.ही विहीर हल्लीं श्री.बायंगोळकर इंजिनिअर यांचे ताब्यांत गेली आहे.

हें ठिकाण अगदीं स्वतंत्र व एकांताचें आहे. यातील घर, मंदीर, झाडें, तुळसी-ंदावन व जवळ असलेली विहीर या प्रत्येकास त्याचा कांहींतरी इतिहास आहे. व तो समजून घेण्यासारखा आहे.

येथपर्यंत त्या स्थानाच्या बाह्य देखाव्याची हकीकत झाली. आतां बाबांची मूर्ती येथें या अशा निर्जन, एकांत व खडकाळ माळावर काय कारणानें आली याबद्दलची हकीकत खरोखरच थोडीशी आश्चर्यकारक व कौतुकास्पद आहे. बाबा शिरडीस बसून अखिल विश्वाची खबर कशी घेत असत व हल्ली ही कशी व कोणत्या स्वरूपांत घेतात व आपल्या भक्तांचा हट्ट व मनोरथ कसा पुरवतात त्याचें हें एक ढळढळीत उदाहरण आहे.

पण बाबांनी आपल्या घरीं केशवराव हे बाबांचे एक निस्सीम भक्त तर खरेंच. पण बाबांनी आपल्या घरीं येऊन रहावे म्हणून केशवरावांनी बाबांचे जवळ जो हट्ट घेतला व जो बाबांनी पुरविला त्याला दोन हेतू असावेत असें दिसतें.

आर्थिक स्थिति समाधानकारक नसल्यामुळें त्यांना वारंवार शिरडीस बाबांचे दर्शनाकरतां जातां येणार नाहीं, म्हणुन बाबांनीं भिवपुरीस आपल्या घरीं कायमचेच रहावयास यावें, हा एक हेतु. व ज्या खडकाळ माळाजवळ यात्रा आले असतां वाटसरूंना भ्रम उत्पन्न होऊन त्यांची दिशाभूल होते व त्यांना त्या माळा भोंवती दोन तीन घिरट्या घातल्याखेरीज आपल्या गांवचा रस्ता सांपडत नाहीं व फार कष्ट होतात या गोष्टीचा बंदोबस्त करणें हा दुसरा हेतु.

आतां केशवरावांची आर्थिक स्थिती जरी समाधानकारक नव्हती तरी त्यांनीं मनांतच आणिलें असतें तर त्याना वर्षांतून निदान एकदां तरी शिरडीस जाऊन बाबांचे पुण्य दर्शन घेतां आलें असतें परंतु तसें करण्यांत त्यांचे दोन तीन दिवस तरी शिरडींत मोडते. व यामुळे दुसरा हेतु (त्या माळावर दिवा लागावा) पूर्णपणें साध्य होण्यास थोडासा तरी व्यत्यय आला असता म्हणून बाबांनीं आपली मूर्ती त्यांना देऊन सांगितलें की माझी ही मूर्ति तूं आपल्या घरीं घेऊन जा व तिची तेथें स्थापना कर व पुन्हा शिरडीस येऊं नको. मी तुझ्या घरीं आहे. अशी कठोर आज्ञा केली, तरी ही तिचें उल्लंघन करून ते जेव्हां एक वेळ शिरडीस गेले तेव्हां बाबांनीं त्याना शिरडींतून हांकून दिले. ही हकीकत बऱ्हंशीं पुराणांतरी वर्णन केलेल्या चंद्रकेतु राज्याचे कथेसारखी आहे.

पूर्वी कलियुगांत चंद्रकेतु नांवाचा राजा राज्य करीत होता. तो श्री विष्णूचा श्री. शंकराचा निस्सीम भक्त होता. तो दररोज वैकुंठास विष्णूच्या व कैलासास शंकराच्या दर्शनास जात असे. पुढे वृद्धापकाळामुळे त्याला वैकुंठास व कैलासास जाण्यास अत्यंत कष्ट होऊं लागले. व आतां मला आपलें दर्शन रोज कसें होईल म्हणून त्यानें देवद्वयांची विनवणी केली. त्यांनीं राजाच्या उत्कट इच्छेचा, निस्सीम भक्तीचा, त्याच्या वृद्धपकाळच्या कष्टाचा व आणखी एका गोष्टीचा विचार करून त्यास सांगितलें कीं श्री गिरनार पर्वताजवळ पायथ्याशी देवताचल ( देव राहण्याचें स्थान ) आहे. तेथें आम्ही दोघेहंच निवास करतों. तेथें तूं एक नगरी बांधून रहा. व तेथून आमचें दर्शन घेत जा व वैकुंठास व कैलासास येत जाऊं नकोस. या आज्ञेनुसार चंद्रकेतूनें गिरनारचे पायथ्याजवळ कुमुद व रैवत देवताचलापाशी जीर्णदुर्ग नावांची एक नगरी ( हल्लींचें जुनागड ) बांधून तो श्री विष्णून व शंकराचें दर्शन तेथूनच घेऊं लागला. या प्रमाणें राजाचा नित्य दर्शनाचा हेतू देवानी घरच्याघरीं पूर्ण केला. राजा श्रीमान होता व त्यानें मनांत आणलें असतें तर रोज लाखो रुपये खर्च करून वाटेल त्या प्रकारानें वैकुंठास व कैलासास

जाऊन इष्ट देवतांचें दर्शन घेण्याची व्यवस्था त्याला करतां आली असती. पण तसें करण्यांत गिरनार व त्याचे जवळील सर्व लहान लहान टेकड्या, पायथ्या जवळील देवता व जीर्णदुर्ग नगरी इत्यादि स्थलांचा उद्धार झाला नसता, व महती वाढली नसती.

आतां दुसरा हेतु म्हणजे या खडकाळ माळावर पिशाचाची वस्ती असून तें वाटसरूंना रात्रीं छळतें, भ्रम उत्पन्न करतें, दिशाभूल करतें व माळाभोंवतीं घिरट्या घालावयास लावते यामुळें वाटसरूंना कष्ट होतात व आपल्या गावचा रस्ता सांपडत नाहीं. अशी लोकांत समजूत होती. ही आपत्ति दूर करण्याकरतां समुद्राचे पाण्यांत दडून बसून जवळून जाणाऱ्या जहाजांची नासाडी करणाऱ्या खडकावर जसा खुणेकरतां दीपस्तंभ उभा करून तो रात्रभर प्रज्वलित ठेवतात त्याप्रमाणें या माळावर ही एका खांबावर दिवा लावावा, रात्रीचे वेळीं तो अखंड जळत ठेवावा, पिशाच्यास सद्गती मिळावी, या माळाचा उद्धार व्हावा व वाटसरूंना रात्रीचे वेळीं आपापले गावीं जाण्यांत अचुक वाट मिळावी. या पवित्र, उदात्त व सद्धेतूनें प्रेरित होऊन बाबांनीं आपले घरीं कायमचें येऊन राहावें असा दीर्घ हट्ट केशवरावांनीं घेतला व तो श्रीकृष्ण बाबांनीं पुरविला. ही ही गोष्ट पुराणांतरीं वर्णन केलेल्या डिंडिरवनाच्या कथे सारखी आहे.

" या वनामाजी अद्भुत ॥ दिंडिरनामें असे दैत्य ॥
तो चालूनेदी सूर्याचा रथ ॥ लोक समस्त पीडित असे ॥ ५६ ॥
डिंडिर दैत्य आणि मल्लिकार्जुन ॥ यांचें सहस्र वर्षें युद्ध दारुण ॥
मग गदा प्रहारें करून ॥ दैत्यासी मल्लिकार्जुन मारी ॥ ६० ॥
माझ्या नामें करून ॥ यासि म्हणावें दिंडिरवन ॥
स्वामी तुवां ही येथें राहून ॥ हेंच वन उद्धरावें ॥ ६८ ॥
दिंडिरवनास होता वर ॥ रुक्मिणी तप करी दुर्धर ॥
म्हणोनी श्रीधर ॥ उद्धारावया आला तेथें ॥ ७० ॥

मूळच्या पंढरपूर क्षेत्राचे ठिकाणीं कृष्णावताराीं एक भयंकर निबिडारण्य होतें. त्यांत एक महादुष्ट राक्षस रहात असे. सूर्याचा रथ अडवून धरून त्या वनांतून येणारे जाणारे ( लोकांस ) वाटसरूंस तो अत्यंत पीडा करीत असे. त्यांची दिशाभूल करीतसे. श्रीकृष्ण परमात्मानीं श्रीमल्लीकार्जुनांचे रूप घेऊन त्या राक्षसावरोबर युद्ध केलें व त्याला मारलें. त्याचें नांव दिंडिर. श्रीरुक्मिणीमाई रुष्ट होऊन द्वारकेहून निघून या दिंडिरवनांत तपश्चर्येंकरितां आल्या. परमात्मा त्यांचा शोध करण्याकरतां, दिंडीर राक्षसाचा

व त्या वनाचा उद्धार करण्याकरतां व भक्तश्रेष्ठ पुंडलीक यांना दर्शन देण्याकरतां या वनांत आले. व त्यांनी ही सर्व कार्ये केली. त्यामुळें सूर्यनारायण व गरुड दिंडिर राक्षसाच्या त्रासांतून मुक्त झाले. व सर्वांचे मनोरथ पूर्ण होऊन त्यांना उद्धार झाला. ( पंढरी महात्म्य )

मला वाटतें वरील कथा केशवराव भेच्य' बाबतींत तंतोतंत लागू पडते. बाबांची मूर्ती भिवपुरीस आल्याशापून व त्या माळावर दिवा लागू लागल्यापासून विशाव बांधे. मुळें होत असलेले वाटसरूंचे श्रम व त्रास साफ नाहीसा झाला.

चंद्रकेतू राजाचे बाबतींत त्याचा युद्धापकाळ जसा श्रीविष्णू व श्रीशंकर या देवतांना, त्याचे नगरींत येऊन राहण्यास कारणीभूत झाला. व दिंडिरवनाचे बाबतींत श्रीरुक्मिणी-माईंचा राग व उदात्त हेतू जसा कारणीभूत झाला तशीच केशवरावांना शिरडी बंद होण्यास त्यांची असमाधानकारक आर्थिक स्थिति कारणीभूत झाली व बाबांनी त्यांच्या घरीं येऊन तेथील सर्व गोष्टींचा बंदोबस्त करण्याचें कामी केशवरावांचा हट्ट व उदात्त हेतु कारणी भूत झाला.

असो येथपर्यंत बाबांची मूर्ती भिवपुरी येथें कां व कशी आली त्याबद्दलची हकीकत झाली.

आतां कांहीं शिरडी भक्तजनांचा या स्थानाबद्दल कसा गैरसमज झाला आहे व त्यांना कशी भिती वाटत आहे त्याचा थोडासा विचार करूं.

या स्थानामुळें शिरडीचें महत्व कमी होऊन शिरडीकडे जाणाऱ्या भक्तजनांचा ओघ कमी होईल. तसेंच शिरडीकडे निरनिराळे स्वरूपांत जाणाऱ्या पैशाचा प्रवाह आटत जाईल अशी त्यांना भिती वाटते.पण मला वाटते हा गैरसमज व ही भिती काल्पनिक आहे. वस्तुस्थिती तशी नाहीं, हें खालील विवेचनावरून कळून येण्यासारखें आहे.

ही जागा, त्यांतील घर, मंदीर, रिकामे झोपडे, बाबांची प्लास्टरची लहानशी मूर्ती, झाडें, आवार व आवारा पलीकडील खुली जागा, ही सर्व मालकीची असल्यामुळें तिला शिरडीसारखें सार्वजनिक स्वरूप कधींच येऊं शकणार नाहीं. ती केव्हांही खासगी मिळकत म्हणूनच रहाणार. तसेंच येथें होणारे दोन उत्सव रामनवमी व पुण्यतिथी हेही खासगी स्वरूपाचेच रहाणार. त्याकरतां जात असलेल्या निमंत्रण पत्रिकाही खासगी स्वरूपाच्याच असणार. बाबांनीं केशवराव यांना आपली मूर्ती दिली. तीही खासगी व त्यांच्याच पुरती.

कित्येक भक्तजन आपल्या घरीं किंवा दरबारीं आपलें आवडतें इष्ट दैवत म्हणून श्रीरामरायाची, श्रीपांडुरंगाची, श्रीशंकराची, श्रीकृष्ण परमात्म्याची, श्रीदेवीची, व अशाच प्रकारें अन्य देवतांची मूर्ती स्थापन करून तिची नित्य पूजाअर्चा, आरती वगैरे करून नैमित्तिक उत्सवही करतात. इष्टमित्रांना निमंत्रणें पाठवितात. उत्सवांत किंवा येरव्हींचे वदशीं सुद्धां त्या मूर्तीपुढें कोणी कांहीं नैवेद्य पदार्थ ठेविले तर त्यांतीलकांहीं थोडा भाग आपण ठेवून बाकीचा भाग प्रसाद म्हणून त्या ठेवणारास परत देतात. कोणी दक्षिणा ठेविली तर तिचाही स्वीकार करतात. म्हणून नाशिकचे रामराय ते नाशिकचेच रामराय. पंढरीचे पांडुरंग ते पंढरीचेच पांडुरंग. काशीचे विश्वेश्वर ते काशीचेच विश्वेश्वर द्वारकेचे कृष्णपरमात्मा ते द्वारकेचेच कृष्णपरमात्मा, व कोल्हापुरच्या जगदंबा त्या कोल्हापुरच्याच जगदंबा ह्या मूर्ती घरीं स्थापन करून त्यांचे किती जरी उत्सव केले तरी त्यामुळें वरील जगद्विख्यात स्थानांचें व मूर्तींचें महत्व कधींच कमी होत नाहीं. व रात्रंदिवस नित्य वाहणाऱ्या असंख्य भक्तजनांच्या प्रभविष्णु प्रवाहास व द्रव्यौघास कधींच खंड पडत नाहीं.

म्हणून शिरडी ती शिरडीच. व भिवपुरी ती भिवपुरीच. बाबांच्या शिरडीचा चोवीस तासाचा नित्य कार्यक्रम शेंकडों रुपयांचा मासिक खर्च. हजारों रुपयांचा नैमित्तिक वार्षिक उत्सवांचा खर्च. बाबांचें दर्शन घेऊन त्यांच्या पायावर अहोरात्र लोळण घालणाऱ्या असंख्य भक्तजनांची लागलेली रीघ, त्यांचेकडून निरनिराळे स्वरूपांत येणाऱ्या संपत्तीचा प्रसन्न व पुण्य पवित्रपद धूळीनें परिपूत झालेल्या श्री द्वारकामाईंतील भव्य, सुबक, मनोवेधक, चित्ताकर्षक, व यथार्थ छवि दर्शनें करून जणुं काय बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनलाभाचा उमटलेला मनावरील आनंदाचा ठसा व तज्जन्य झालेल्या शांतिसुखाचें समाधान, या सर्व गोष्टी, व भिवपुरी संस्था खाजगी आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे श्री क्षेत्र पंढरपूर या आदिपीठाचें महत्व, अन्यत्र असंख्य पंढरीरायाची देवालयें असली तरी किमपिहि कमी झालेलें नाहीं, तसेंच भिवपुरी येथील या बाबांच्या चिमुकल्या देवालयानें अगर या पुढें इतरत्र तशीं शेंकडों देवालयें झाल्यानें बाबांच्या शिरडीचें महत्व यत्किंचितही कमी होण्याची भीति नाहीं. व शिरडी या बाबांच्या मूळपीठाकडे वहाणारा भक्त वृंदाचा व द्रव्याचा जोराचा प्रवाह रोड होऊन तो भिवपुरीकडे वळण्याचीहि भिति नाहीं.

प्रधान हयात होते तोपर्यंत ते ही सर्व व्यवस्था करीत. पण आपले पश्चात येथें दिवा लागावा, बाबांची नित्य पूजा आरती व वार्षिक उत्सव व्हावेत अशा

सद्धेतूनें त्यानी ही कामगिरी त्याचे आज्ञाधारक, तरतरीत, उत्साही, तरुण व बाबांचे
जामात श्री. वामनराव उर्फ बाबूराव गुप्ते याना सांगितली. व ती मनोभावें पुरी कर-
ण्याची दिव्य प्रेरणा विश्वमोचन बाबांनी गुप्ते यांचे कोमल, बाळ व उत्सुक अंतःकरणांत
केली. व त्या प्रेरणेनुसार व केशवरावजी दिवंगत झाल्यानंतर अलीकडे दोन वर्षे श्री
गुप्तेच ती कामगिरी, श्री सद्गुरु साईनाथ सेवा संस्थेच्या व इतर स्नेही मंडळींच्या
मदतीनें स्वतः झीज सोसून करीत आहेत.

या संस्थेंत जर कांही विशेष असेल तर तो हाच की ह्या संस्थेचें सर्व सभासद तरुण आहेत त्यांत जरठ असें कोणी नाहींत. गुप्ते यांचें वय ३० चे आंत बाहेर असेल. गुप्ते यांची ह्लीची वृत्ति बाबांच्या भक्तिसेवेकडे जर निरंतर अशीच कायम राहिली तर ते खात्रीनें संतसेवेचे गुरुजनांच्या आज्ञाधारकतेचें व श्वशुरांच्या परोपकारी लोक संग्रहाचें अमोलिक उदाहरण पुढील तरुण पिढीस घालून देऊन " सामर्थ्य आहे चळवळीचें । परी अधिष्ठान पाहिजे देवाचें ॥ या समर्थोक्तीची तिला साक्ष पटवून देतील अशी निश्चितता वाटतें.

या जागेजवळच गुप्ते यांचें स्वतःचें लहानसें घर व थोडीशी भातशेतीहि आहे. हें वर लिहिलेंच आहे. ते शिवपुरी निवासीच आहेत. बाबांच्या या सेवेपासून गुप्ते यांचें उत्तरोत्तर कल्याणच होत जाईल. या बाबांच्या सेवेबद्दल संस्था खाजगी असली तरी तिला शक्य तों मदत करणे व उत्तेजन देणें हें प्रत्येक संतभक्ताचें कर्तव्य आहे असें मला वाटतें. इति शम.

ठाणें, गुरुवार शके १८६२
कार्तिक कृ. ७ दि. २१-११-४०

बाबांचें बाळ.

# देह दुर्ग

(शालिनी वृत्त)

देहदुर्ग अति दुर्घट भारी ॥
जीव येथिल असे अधिकारी ॥
पांच इंद्रियाचि हे दरवाजे ॥
ज्ञान येथ सुपताक विराजे ॥ १ ॥

ज्ञान तंतु बहु हेर शहाणे ॥ किल्ल्यांतरित दोष पहाणें ॥
हेच काम दिधलें कितयाना ॥
साधिती करूनि यत्नाचि नाना ॥ २ ॥

बैसुनी मन विमानिं पहाती ॥
शत्रु कोठून कसे किति येती ॥
काम क्रोध अति लोभ रिपु हे ॥
यत्न आंत शिरण्या करिती हे ॥ ३ ॥

वासना विषय मोह विकारी ॥
शिरण्या करि प्रयत्नाचि भारी ॥
आत्मसंयम बली तर पाहा ॥
निश्चय स्वरुष तोफ अहाहा ॥ ४ ॥

सज्जसे झगडण्या रिपु संगे ॥
त्यामुळें तट कधीं नच भंगे ॥
मेंदु कोटर असे जणु पाही
ज्ञान तंतु तयान्नचि देई ॥ ५ ॥

शांति हीच किल्ल्यातिल देवी ॥
तीस क्षमा सहृदया विहरावी ॥
हीच कीं मम विनंति प्रभुला ॥
जोडुनी कर पदें दिवराळा ॥ ६ ॥

सौ. कमलाबाई करंदीकर

# आरती

जयदेव जयदेव जय साईनाथा । हरती सर्वहि
दुःखें तवनाम घेतां ॥धृ॥
पंचप्राणाच्या या उजळीलया वाती ॥
ऐशी ओवाळिते तुज पंचारती ॥
जन्म शतांचे पातक जळुनिया जावो ॥
राहो चरणीं तुझिया मन हा दृढ भावो ॥ १ ॥ जयदेव ॥

जाण्या दुस्तर तरुनी हा भव कूपार
साईनाथा न्यावें मजला त्या पार ॥
तोडुनी मायापाशा मुक्ती दे मजसी ॥
जोडुनि हस्ता विनती करिते चरणासी ॥ २ ॥ जयदेव ॥

सौ. कमलाबाई करंदीकर

# शिरडीवृत्त

नवंबर १९४०.

या महिन्यांत पुणे, अहमदनगर, लोणावळा, देवास, नाशिक व शीव ( मुंबई ) या महाराष्ट्रीय गावचे व मद्रास, त्रिचनापल्ली, पोदनूर व गंतुर या मद्रदेशीय गावचे भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

## देणग्या.

आलेले भक्तांकडुन कोठी, कायमफंड वगैरे संस्थानचे फंडास लहानसहान आर्थिक देणग्या आलेल्या पावत्या बरहुकूम जमा आहेत. त्यांत शेट दिनसा आदरजी सराफ स्टीट चाळ, थी ब्लॉक, नं. १ बाळाराम स्ट्रीट, ग्रँटरोड, मुंबई या पारशी भक्तांकडुन श्री रतनबाई यांचे स्मरणार्थ कायम फंडास रु. १०१ ची देणगी आली आहे.

## धर्मकृत्यें.

या महिन्यांत एकंदर ६२ अभिषेक, ५ अर्चने व १ लघुरुद्र भक्तांचेकडुन झाले श्री. एस. अनंतल्वार, ट्रिप्लीकेन, व श्री. कांनिलाल जव्हेरी शेट महाबळेश्वर यांचेकडुन गरीबांस अन्नदानें व श्री. श्रीराम नीळकंठ चौबळ, खार ( मुंबई ) यांचेकडुन ४२ ब्राह्मण भोजन झालें. शिवाय पेढे, बरफीचे वगैरे भक्तांचे नैवेद्य झाले.

## नवलविशेष.

श्री. प्रोफेसर गणपतरावजी नरके, पुणे, यांनी श्रींचे मंदीरांत दोन दिवस कीर्तनाची हजेरी दिली.

कार्तिकी एकादशी निमित्त श्रींचे समाधीस अभ्यंग स्नान, व अभिषेक, मंदीरात कीर्तन व रात्री श्रींच्या पालखीची मिरवणूक झाली.

## कीर्तनें.

संस्थान गवयाचीं का. शु. ११ व व. ११ अशी दोन व एक आत्मारामबुवा अशी तीन कीर्तनें या महिन्यांत झाली.

## स्थानिकवृत्त.

कांही स्थानिक सद्गृहस्थांनी आपसांत वर्गणी करून आठवड्याचा नवाकाळ हें पत्र संस्थान लायब्ररीचे नांवें सुरू केले असोन त्या बाबतींत गावचे शाळामास्तर यांचे संस्थानचे लायब्ररीचे काम पहाणारे नोकराबरोबर उद्दामपणाचें वर्तन असलेचा रिपोर्ट मे. कमिटीचेकडे आलेला आहे. तूर्त कमिटीकडुन या बाबतीची चौकशी होऊन निर्णय होईपर्यंत अशा भानगडीचे प्रकरणांस आळाबसणेचे उद्देशानें गावचे शाळामास्तरवर्गांस संस्थानचे लायब्ररीचे उपयोगाची बंदी ठेवणेस संस्थान नोकरांस बजाविलें आहे.

हवापाणी उत्तम असोन थोडा पाऊसही पडला. पिकें उत्तम असल्याचा बोलवा आहे.

श्री. ना. खारकर.

ऑ. चिटणीस

## चुकीची दुरुस्ती

गेले ( कार्तिक ) अंकांत पान ३१२ वर भक्तांस विनम्र विनंती छापिली आहे तीत पॅराग्राफ एकचे ओळ आठमध्यें रु. १००१ चे ऐवजीं रु. १०१ आंकडा चुकीनें पडला आहे. रा. रा. ना. आ. सावंत यांची देणगी रु. १००१ ची आहे रु. १०१ ची नव्हे.

त्याचप्रमाणें पान ३१४ वरील देणग्या सदराखालीं " रा. रा. विठ्ठलराव गुणाजे साळसकर, इन्स्पेक्टर, सी. आय. डी. यांचेकडून रु. ५० ची बिल्डिंग फंडास देणगी आली आहे. या पूर्वी त्यांनीं रु. ५० ची अशीच मोघम देणगी दिलेली धरून रु. १०० त्यांचे नांवें बिल्डिंग फंडास जमा धरणेविषयीं त्यांनीं रा. रा. नागेशराव सावंतांचे मार्फत चिटणीस यांस कळविलें आहे. "

—संपादक

श्री दत्त चिद्पाद सद्गुरूभ्योनमः

# पुण्यातिथी उत्सव

## श्री. समर्थ सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज शिरडी संस्थान यांच्या शके १८६२ सालच्या पुण्य तिथि उत्सवाचा वृत्तांत

उत्सवाकरतां पुढील बाहेर गावाहून भक्त मंडळी आली होती.

ठाणे, दादर, मुंबई, बांद्रे, सांताक्रूझ, वसई, पुणें, मांजरी, नगर, मनमाड, संगमेर, बारामती, हतगांव, शिरवळ, भामटेक, भुसावळ, राहुरी, लोकमठाण, निमगांव, पुणतांबे, एकरुखे, कोपरगांव, मद्रास, धर्मावरम, नेल्लोर, अडोनी, अलंधर.

### भिक्षा

विजयादशी गुरुवारीं व पुण्यतिथी दिवशीं शुक्रवारीं मिळून या दोन दिवशीं दरसाल प्रमाणें बाबांचे नांवाचे जय घोषांत गांवांत सर्व संस्थान लव्याजम्यासह भक्त मंडळींनी भिक्षा मागितली.

### सरस्वती पूजन

सांवत्सरिक कार्यक्रमाप्रमाणें या वर्षींही श्री साइनाथ लक्ष्मी दामोदर बाबरे चिंचणकर वाचनालयांत विजयादशमीचे दिवशीं सकाळीं थाटाचें शस्त्रसंभारासहित श्री सरस्वती पूजन झालें. श्री नानासाहेब खारकर यानी पेढ्यांचा प्रसाद सर्वांस वाटला.

### कीर्तनें व गायन

या उत्सवांत शिरडी संस्थान गवई श्री. मराठे यांची ४ व श्री. देव यांची २ अशी एकंदर ६ कीर्तनें झाली. श्री. इंदुमतीबाई चौबळ यांचे पुण्यतिथी दिवशीं दुपारीं बाबांचे समाधि मंदिरांत सुश्राव्य गायन झालें.तसेंच श्री.क्षीरसागर यांचे ही सुश्राव्य गायन झाले.

### प्रवचनें व पुराण

नित्य पुराण श्रीचे मंदिरांत चालू होतेंच. उत्सवाचे पांच दिवस खेरीज करून श्री. देव यांची श्री ज्ञानेश्वरी प्रवचनें श्री पुढे नित्य चालू होतीच.

### कोजागरी

प्रतिवार्षिक कार्यक्रमा प्रमाणें यंदा ही कोजागरी पौर्णिमा थाटाची झाली. भोजन पात्र ४०-५० झाली. रात्री श्रीचे मंदिरांत कीर्तन श्रीचे समाधिचें षोडशोपचारें पूजन

दत्तसहस्रनाम वाचन युक्त तुळसी सहस्रदल समर्पण, नारीकेळजल, पोहे, खोबरे, पेढे खडीसाखर, शर्कराभिश्रित उष्णपेय नैवेद्यसमर्पण, रजनीनाथार्चन, कोजागरी कथाकथन व अक्षक्रीडन वगैरे सर्व कार्यक्रम निर्विघ्नपणे यथास्थित पार पडला.

## बाबांच्या तपोवनांतील भोजन

उत्सवाचा पांच दिवसाचा कार्यक्रम व कोजागिरी कार्यक्रम संपल्याबरोबर श्री. दादाजी गोपिनाथ जोशी आदी भक्तजनांचे लागोपाठ भोजन कार्यक्रम असलेमुळे व पर्जन्य वृष्टी ही जोराची होत असलेमुळे नवाच पौर्णिमेचें बागेतील भोजन शनिवारीं दुपारी झालें. सर्व स्त्री पुरुष मिळून ६०–७० पात्र झालें. दुसरे दिवशी रविवारीं गावां-तील फक्त महिला मंडळी करतां नुसतें पिठलें भाकरीचें भोजन बाबांच्या तपोवनांतच थाटाचें झालें. महिला समाज सुमारे १०० पर्यंत होता.

## भोजन पात्रे व भोजनाचा बेत

भोजन पात्रें भंडार भोजन व इतर भोजनासह अजमासे ३००० वर झाली दसरा व पुण्यतिथी या दिवशीं श्रींचे नैवेद्य व आराधनाविधी श्राद्ध भोजनापुरती पंच-पक्वान्नें केली होतीं. बाकी सर्व मंडळींस पांच ही दिवसांत भात, वरण, तूप पोळी शिरा, दोन भाज्या, दोन चटण्या व ताक भरपूर होतें.

## अभिषेक व आराधनविधी

लघुरुद्र व एकादशिन्या मिळून अजमासे ७०–८० अभिषेक श्रींचे समाधीवर झाले. शिरवळकर श्री. दत्तोपंत उर्फ बगोबा तात्या मोने यांनी सालाबादप्रमाणें आराधना विधी श्राद्ध उत्तम तऱ्हेनें पार पाडला. तसेंच उत्सवास आलेल्या मद्र देशस्थ भक्त-जनांचीं अर्चनें ही बरीच झालीं.

## बाबांचें तपोवन वा बाबांचा प्रधान लेंडी बाग

या उत्सवांत या बागेनें बाबांची दरसालप्रमाणें आपल्या आवारांतील, २००० केळीचीं पानें, केळफुले, हिरवे केळांचीं लोंगरें, पिकली केळी, पोपया, सिताफळें, डाळिंब, केळीचे खुंट, तुळशी, बेल, फुलें, मिरच्या, कोथिंबीर वगैरे पदार्थ देऊन बाबांची चांग-लीच सेवा केली. त्याबद्दल रु. १५ उत्सव व्यवस्थापकाकडून आलेले बाग खात्यास जमा केले. रा. बहादुरांचें व त्यांच्या कुटुंब व परिवाराचें बाबा सदैव कल्याण करोत.

## देणगी

दरसालप्रमाणें या उत्सवकार्यांत सर्व संस्थान नोकर, अबदुलभाई, चोपदार, ताशे-वाले, पालखीवाले अबदागिरवाले, चर्मकार, सुतार, मातंग, निराश्रित, अनाथ, पंगु, अंध वगैरे एकंदर ३२–३३ मंडळीस श्रींचा प्रसाद म्हणून कपडे वाटले.

त्याचप्रमाणे इंग्रजी वर्गांतील गरीब मुलांस व तृतीय पुस्तकें विकत घेण्याकरतां व खाऊं करतां रोकड रकम दिली.

## औदार्य

प्रत्यब्दाप्रमाणें या उत्सवांत ही खालील सद्भक्तांनी सढळ हस्तानें मदत करून आपले औदार्य प्रगट केलें.

१ श्री. सौ. लक्ष्मीबाई वहिनी साहेब गाडगीळ पुणें यांनी भंडार भोजनास खर्च रु. २४ चोवीस दिला.

२ श्री दादाजी गोपिनाथ जोशी,दादर यांनी एक दिवस कांहीं गांवकरी मंडळीस लाडूचें भोजन दिले.

३ संस्थानचे चिटणीस यांनीं भक्तांचे इच्छेनुरुप एकदिवस गरीब लोकांस लाडूचे भोजन दिलें. व शाळेतील सर्व मुलांस व शिक्षकास प्रत्येकी एक याप्रमाणें २००-२५० लाडू वाटले. त्याचप्रमाणें गरीबांस वस्त्र, पात्र व बाबांची चांदीची लॉकेट व चिल्लर वाटलें.

४ श्री रंगाप्पा संजीवाप्पा अडोनी या मद्रदेशस्थ व्यापारी भक्तानें पुण्यतिथीचे दिवशींच्या श्रींच्या पंचपक्वान्नाच्या नैवेद्याचा खर्च रुपये ३० दिला.

५ श्रीमंत कृष्णाबाई मासाहेब देवासे यांनी देवाचे पूजेचा व कांहीं पात्रांच्या भोजनाचा खर्च २५ रु. दिला.

६ श्री सौ. जानकीबाई देव ठाणें यांनी बाबांच्या तपोवनांत रुपये १५ खर्च करून गावांतील सुमारे १०० महिला मंडळींस पिठलें भाकरीचें भोजन दिलें.

ही सर्व भक्तांची औदार्य कृत्यें स्तुत्य व अनुकरणीय आहेत.

## जमाखर्च

उत्सव जमाखर्चाचा अहवाल संस्थानमार्फत आलाहिदा प्रसिद्ध होईलच.

## नमन प्रार्थना, व याचना

### शिखरिणी

नमस्ते, संपूर्णे, अमृतकिरणे, साइकरुणे ॥
क्षमादोषांचीही, करि,विनति, संसारतरणे ॥
जयस्ते घे सेवा, कडुनि आमुच्या नित्य उदये ॥
सुबुद्धीचिद्भात्, सुरभि, उगवो बालहृदये ॥

ठाणे, गुरुवार
शके १८६२ कार्तिक शु. १५
दिनांक १४-११-४०

संतपदरजदासानुदास
बा. वि. देव

# अनुभव

(श्रीयुत गजानन महादेव कुळकर्णी, [illegible] बिल्डिंग, [illegible], कुर्ला, ता. २८।११।४० चे आपले पत्रानें कळवितात.)

## बाबा आपले भक्तास आपलेकडे कसे खेचून आणतात.

### अनुभव १ ला.

१९०६ ते १९०८ पर्यंत मी नगर येथें मामाकडे शिक्षण घेत असतांना तेथील फोटोग्राफर श्रीयुत देशमुख यांची व माझी ओळख झाली. रा. देशमुख हे त्या वेळीं नगर कोर्टांत सेक्शन रायटर होते व फावल्या वेळीं फोटोग्राफरचाही धंदा करीत होते.

त्यावेळीं नगर येथें फारसे फोटोग्राफर नव्हते. कॅम्पात एक 'नरसू येसू' म्हणून प्रख्यात व जुना फोटोग्राफर होता. गावांत कोणीही नव्हता. त्यामुळें देशमुख यांना चांगले काम मिळे.

असाच एके दिवशीं रा. देशमूख यांचेकडे बसलो असतांना त्यानी काढलेल्या फोटोचे आल्बम चाळू लागलो. चाळतां चाळतां त्यांत एका अवलियाचा फोटो दिसला. धक्क्यावर बसलेली ती विचित्र मूर्ति पाहातांच माझे लक्ष तिकडे वेधलें. किती वेळ तरी

त्या फोटोकडे पहात होतो. आकर्षण इतकें जबर होतें की त्याचें वर्णनच करतां येणार नाही.

रा. देशमूख यांना हा फोटो कोणाचा म्हणून विचारतांच त्यांनी तो 'साईबाबा शिरडी' यांचा असल्याचे सांगितले. हेंच माझें व बाबांचे प्रथम दर्शन. तो फोटो त्यांनी काढला होता की त्यांनी आणला होता हे मला आतां आठवत नाही.

फोटो पाहिल्या दिवसापासून मात्र असें वाटूं लागलें की शिरडीला जावें व बाबांचें दर्शन घ्यावें पण त्या वेळचे विचारांना १९१३ पर्यंत मूर्त स्वरूप आलें नाही. कारण थोडेच दिवसांत मला याचें पूर्ण विस्मरण झालें.

या नंतर शिक्षण संपल्यावर मी मुंबईला नोकरीला लागलो. नोकरीवर असतांना पुन्हा विचारांनी उचल खाल्ली की बाबांचेकडे जावें. वास्तविक मागील प्रसंगाला पांच वर्षे लोटली होतीं. मी बाबांचे नावही विसरलों होतों. मग एकदम ही उपरती कां झाली याचे कारण तेच जाणोत.

लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे बाबांच्या संबंधानें मला कोणी लव्या चवड्या गोष्टी सांगितल्या नव्हत्या अगर लीलांचें भडक रंगांत कोणी वर्णनही केलें नव्हतें की त्यामुळें मी बाबांचेकडे जाण्यास उत्सुक झालों.

बाबांचेकडे जाण्यास सारखी ओढ लागून राहिली होती. जावयाचें ठरलें पण माझे पुढें दुसरी एक अडचण होती. आमचे वडील मोठे करारी व कर्मठ होते ते मला परवानगी देतील असें वाटेना. त्यांचे पुढें माझी उभे राहण्याचीही सोय नव्हती मग परवानगी मागणें तर दूरच.

पण शेवटीं मनाचा हिय्या करून मी त्यांना माझा हेतु कळवितांच त्यांनीं मोठ्या आनंदानें परवानगी दिली व प्रवास खर्चात पंधरा रुपये काढून दिले. मला मोठें आश्चर्य वाटलें की हें झालें कसें.

पुढें निघण्याचें ठरल्यावर आपण एकटे न जातां कोणी सोबत मिळाल्यास पहावें म्हणून माझे स्नेही रा. लक्ष्मण महादेव प्रधान व रा. काशिनाथ कोरडे यांना विचारतांच ते दोघे एकदम तयार झाले व कधीं निघतां म्हणून मलाच उलटे त्यांनी विचारलें.

मला पुन्हां आश्चर्य वाटलें की हे आहे काय ? कारण माझी गोष्ट निराळी होती. माझे वडील सधन होते व मला प्रवासाची रक्कम मिळणें यांत नवल नव्हते. पण माझे

दोन्ही मित्रांची स्थिति तशी नव्हती. हे दोघेही नुकतेच बदली तलाठी लागले होते. अजून कायमही नव्हते. पगार बेताचाच. यांतून त्याचे जवळ १०।१२ रुपयांची पुंजी असणें अशक्यच. पण मौज ही की दोघांनाही पैशासंबंधी कांही चिंता दाखविली नाही व माझे जवळ पैशाची याचनाही केली नाही.

ठरलेल्या दिवशीं ठरलेल्या गाडीनें आम्ही तिघेही शिरडीस जाण्यास निघालो. तारीख नक्की आठवत नाही पण १९१३ चा मार्च महिना असावा. आम्ही तिघेही शिरडीला अनभिज्ञ होतो. शिरडीची अशी कांहीच माहीती आम्हांपैकी कोणालाही नव्हती. फक्त कोपरगांव स्टेशनला उतरावयाचे येवढेंच ठाऊक होते.

कोपरगांवला आम्ही सकाळीं ७।८ वाजतां पोहोंचलो. स्टेशनवर उतरतांच शिरडीला जाणारी बरीच मंडळी आम्हांस भेटली त्यामुळें आम्हांला कांहीच अडचण पडली नाही.

शिरडीला पोहोचतांच कोठें उतरावयाचें हेंही आम्हांस ठाऊक नव्हते. पण तेथें जातांच आम्हाला एक सद्गृहस्थानी आम्हाला इतकी मदत केली कीं सांगता सोय नाहीं. उतरावयाची सोय लाऊन दिली, बाबांचे दर्शन घडवले. रा. चांदोरकर यांना सांगून त्याने उपहारगृहांत आमचे जेवण्याची सोय केली इतकेंच नव्हे तर आमचा मुक्काम तेथें असेपर्यंत त्यानी आम्हाला हरएक मदत देऊन उपकृत करून ठेवले. (त्यांना आण्णा म्हणून म्हणत असत.) बहुतेक आण्णा चिंचणीकर अगर शाम तर नव्हेत !)

आमचा मुक्काम येथें २।३ दिवस होता. बाबांचा हुकूम झाले शिवाय तुम्हाला जाता येणार नाहीं म्हणून आण्णानीं आम्हास अगोदरच बजावले होते. उतरावयाची जागा चांगली, जेवण्याचीहि अडचण नाहीं. बाबांचे रोज दर्शन व रा. आण्णाचे सारखा सहाय्यक अशा गोष्टींचा मिलाफ झालेमुळें शिरडीहून जाणे आमचे जिवावर आले होते. पण श्री. प्रधान व कोरडे यानी रजा काढली नसल्यामुळें ते चिंतेत होते. तिसरे दिवशी आम्हांस उदी व प्रसाद मिळून जाण्यास आज्ञा झाली. व आम्ही जड अंतःकरणानें परत फिरलो जातांना व येतांना दोन्ही वेळ आमचा प्रवास सुखांचा झाला.

या अनुभवांत विशेष कांही आहे असें कोणास वाटणार नाहीं. पण नीट पाहिल्यास त्यांत बाबाच्या कैक लीला दिसतील, त्या भक्ताना उलगडून सांगण्याचें कारण नाही.

" बाबांचा चरणरज "

## अनुभव २ रा.

रा. केशव बळवंत गुप्ते ( भादाणकर ) एक वयोवृद्ध गृहस्थ पुढीलप्रमाणें बाबांचे उदीचा त्यांस आलेला अनुभव रा. रा. खारकर, चिटणीस यांस समक्ष ता. ९-१२-४. रोजी कळवितात व रु. ५ त्यांचेजवळ देऊन शिरडीस पाठवून बाबांचे चरणी अर्पण करणेस सांगतात. या गृहस्थांस बाबांची फक्त ऐकीव माहिती होती. गेले ऑक्टोबर महिन्यांत ते ठाणे येथून आपले घरी भादाणें येथें जातांना रा. खारकर यांचा निरोप घेतांना त्यांना खारकर यांनी प्रेमपूरस्कर एक बाबांचे उदीची पुडी दिली होती. त्यांचे राहतें गांव भादाणें हें भिवंडीसारखे तालुक्याचेच गांवापासून ९।१० मैल दूर असें खेडें-गांव आहे. पांढरपेशाची वस्ती दोन चार घरांचीच. रा. गुप्ते यांची थोडीशी तेथें शेती व घर असलेमुळें ते सेवानिवृत्त झालेपासून तेथे एकटेच राहून नोकरामार्फत शेतीची कागवड करीत असतात. अशा परिस्थितींत त्या गावढ्यांतील लोकांची त्यांचेकडे वेळ प्रसंगी आशाळभूत दृष्टी राहणे साहाजिकच असून तेही त्या तत्वानुसार वागत असतात. अशा परिस्थितीत ऐन दिवाळीचे दिवसांत त्यांचेच शेजारची अगदी गरीब स्थितीतील अशी एक अल्पवयी बाई प्रसुतकाळीं मुलाचा एक हातच बाहेर येऊन अडली. गावांतील सुहीणीच्यानें सुटका होणें अशक्य. अशावेळीं जवळच मैल दीडमैलांवर असलेले ल्हानसे पाडे या गावाहून तज्ञ अशी सुहीण मागविणेची योजना रा. गुप्ते यानी करविली. तरी पण प्रसंग प्राणांतीक व उपाय योजनेस विलंब अशा विवंचनेंत असतां त्यांस त्यांचे जवळ असलेले बाबांचे उदीची आठवण झाली व त्यानीं उदी त्या बाईस लावणेस दिली. दीनांचा वाली परमात्मा आहे. व संकटांत तो त्यांचे रक्षण करितो ही भावना मनांत घोळत असतां ५।१० मिनिटांचे अवधींत बाईची सुटका होऊन मृतमूल झालेले ऐकून रा. गुप्ते यांचे मनास बाबांचे वात्सल्याबद्दल व अगाध शक्तीबद्दल कौतुक वाटून प्रेमाश्रु आले व लागलेच त्यानीं ठरविलें कीं जरी आपण संकल्प केला नव्हता तरी ठाणेस परत जातांच शिरडीस रु. ५ बाबांचे चरणीं आर्पण करणेस पाठवावे व हा आलेला आपला अनुभव रा. खारकर यांस कळवावा. असो अघटीत करणी अगाधलीला त्या सद्‌गुरुरायाची !

श्रीराम समर्थ




**श्रीसमर्थ वाग्देव महाराज व मुक्ताबाई**

मुंबई—नवरोजगल्ली चैत्र शु. १ र. शके १८४२.

ता. २१-३-२१

# श्रीसद्गुरु साईबाबा.



श्रीयुत कृष्ण जगन्नाथ थळी, श्रीसंतसंघ पुस्तकमाला कार्याश्रम व रामसेवक चित्रालय, मुंबई, याचे चालक, यांचे कडून त्यांना सन १९१२ सालांत श्रीसद्गुरु साईबाबांचा आलेला अनुभव व श्री समर्थभगवान् वासुदेव महाराज, मुंबईत बरेच वर्षे प्रसिद्ध असलेले व आलीकडेच गत झालेले अधुनिक संत, यांचा व श्री सद्गुरू साईबाबा यांचा असलेला ऋणानुबंध, याबाबतचे हकीकतीचे नुकतेंच हाती आलेले पत्रांतील मजकुराचा लाभ बाबांचे भक्तवृंदास मिळावा या हेतूनें ते पत्र श्रीसाईलीला मासिकांत पुढें दिले प्रमाणें प्रसिद्ध करणेंत येत आहे.

श्री. थळी, हे श्रीवासुदेव महाराजांचे कृपाश्रित भक्त आहेत. त्यांना त्यांचा सहवास सतत १५ वर्षे घडला आहे. त्यांनी त्यांचेच प्रेरणेने आपले मूळचे चित्रकलेच्या व्यवसायास तिलांजली देऊन श्रीसंत संघमाला प्रकाशनाचा कार्यभाग सन १९१० साली हाती घेतला व आतांपर्यंत एकंदर पांच भाग प्रसिद्ध केले आहेत. प्रत्येक भागांत आधुनिक संतांची त्रोटक चरित्रे व छायाचित्रें दिलेली आहेत. दुसरे भागापासून चवथे भागापर्यंत ही चरित्रें मराठी व इंग्रजीत दिली आहेत. नुकताच प्रसिद्ध झालेले पांचवे भागांत ही चरित्रें हिंदीतही देणेचा उपक्रम केलेला आहे. ही थळी याची कामगिरी म्हणजे श्री. साईबाबांचे आज्ञेनुसार ह. भ. प. दासगणू यांनी मदिरतीकृत पुरातन संतमालिकेस

आपले भक्तिलीलामृत, संतलीलामृत, संतकथामृतादि ग्रंथांनीं आधुनिक संतांचा पुरवणी जोडिली आहे त्याच दर्जाची आहे. संतवाङ्मय प्रेमी भक्तांनीं या मालेचा आवश्य लाभ घ्यावा. त्याचप्रमाणें श्री. थळी यांचेकडून त्यांचे २३ वर्षे वयाचे गतकन्येचे स्मरण म्हणून " मुक्तास्मरण " या नावाचे वृत्ताचे प्रसिद्ध झालेले पुस्तक संतांचे सहवासानें पामरजीवांना आत्मोन्नति मार्गाचें कसें वळण मिळतें याचें एक उद्बोधक दृश्य आहे. पारमार्थिक विषयाची आवड असलेले प्रत्येकानें तें आवश्य पहावें.

श्री. ना. खारकर.

ऑ. चि. शि. संस्थान.

श्री. थळी यांचे ता. ९–२–४० चे पत्रावरुनः—

पद—ख्याला कशाला दुशाला मशाला ॥ ध्रु० ॥

अवस्था त्रय सांडूनी दिन निशाला । आत्मसुखें विचरतसे पांचरी दिशांला ॥ त्या० ॥ १ ॥ याचना न करी कांहीं पसरी करपशाला । सहज स्थिति शयन करी घेई कर उशाला ॥त्या०॥२॥

देह गेह सांडुनियां सांडिलें आशेळा । अमृतराय म्हणे काय करिल यम यशाला ॥ त्या० ॥ ३ ॥

प्रामुख्यानें मनास हीच आवड होती आहे व असगारही कीं, वरील पद्यांत श्री. अमृतरायांनीं वर्णन केल्याप्रमाणें अशा सिद्ध पुरुषांच्या देहाचें दर्शन एकवेळ घडून मनाची आवड तृप्त व्हावी. व ह्याच आवडीमुळें सन १९१३ सालांत मनाला वाटलें कीं, शिर्डी येथील सिद्ध पुरुष श्री. सांईबाबा महाराज ह्यांचें देहदर्शन घडावें व ह्या अतिउत्सुकतेच्या भरांत खालीं लिहिलेल्या कविता त्यांचे भक्त कै. वा. हरी सीताराम दीक्षित हे त्यावेळीं शिर्डी येथें असल्यानें त्यांचें नांवी ह्या कविता व थोडा मजकूर लिहून पत्र पाठविलें. त्या पत्रांतील मजकुराचा सारांश ह्राच होता कीं, " आपणास ( श्रीसाई बाबांच्या देहास ) पाहण्याची प्रबळ इच्छा झाली आहे. आपण मुंबईंत या आणि सर्वांना आपलें दर्शन द्या. आपण म्हणाल कीं मी तुझेच जवळ आहें तर मात्र तसें म्हणूं नका प्रत्यक्ष देह दर्शनच पाहिजे. "

## पाठविलेल्या कविता.

### आर्या.

स्फुरलें मानस येथें, वर्णाया गूण सांई बाबांचे ।
सद्गुरु कृष्ण कृपेनें, बोलो रसना सदैव ते वाचे ॥ १ ॥

वदवी श्रीकृष्ण गुरु, स्थिरचरव्यापक अखंड सुखकारी ।
सहकारी संसारीं, भवभय छेदक दयाब्धि अघहारी ॥ २ ॥

कृष्णार्पण होवो हे, सुखदायक गोडबोल बाळाचे ।
करद्वय जोडुनि विनती, पुरवो लडिवाळ कृष्ण बाळाचे ॥ ३ ॥

श्रीसद्गुरु कृष्ण पदार्पणमस्तु.

### आर्या.

सुखकर दर्शन देई, सदय हृदय स्वामि सांइबाबा हो ।
रुतलों या भव-पंकीं, ने विलया साहि सांइ बाबा हो ॥ १ ॥

### पदें.

पदः—राम स्मरावा राम; या चालीवर.

सदय हृदय तूं दयाळ । सांइबाप । सदय हृदय तुं दयाळ ॥ धृ० ॥
शिरडी ग्रामीं अवतरुनी करी । दीन भक्त प्रतिपाळ ॥ सांइबाप ॥स०॥१॥
भक्तकाज कल्पद्रुम स्वामी । अससी षड्रिपु काळ ॥ सांइबाप ॥ स० ॥ २॥
नमती जे तुज अनन्यभावें । गळवुनि हंकृति व्याळ ॥ सांइबाप ॥ स०॥३॥
मुक्त करिसि त्यां दर्शनमात्रें । स्वानुभवें तत्काळ ॥ सांइबाप ॥ स० ॥ ४ ॥
राव रंक सम समान तुजला । अभेद तूं सर्वकाळ ॥ सांइबाप ॥ स० ॥ ५ ॥
कृष्ण गुरुकृपें बघतां सदया । कृष्ण हृदयीं तूं अढळ ॥ सांइबाप ॥ स० ॥६॥

पदः—आहा रे कृष्ण मुकुंदा० या चालीवर.

येइं येइं सांईनाथा । दे दर्शन मज झडकरिं आतां ॥ ध्रु० ॥ मन धांवलें तव चरणीं । म्हणुनि स्मरिला तुज मी स्मरणी । पवित्र शिरडी तरणी । केली महा अधिकारि महंता ॥ ये०॥१॥ भक्त तुझे गुण गाती नानापरि जगीं नाचति ध्याती । ऐसी त्रिभुवनी ख्याती । जड्ाली क्षणमात्रें अवचीता ॥ ये० ॥ २ ॥ संत दयाळ तुम्हीं हो । आर्त पुरवा मज दर्शन द्या हो । या या या या या हो । वाग्देवीं तुज पाहिन आतां ॥ ये० ॥ ३ ॥

पदः—रुचती का तीर्थ यात्रा० या चालीवर.

प्रिय साई येईं येईं मज भेटी देइं हो । वाग्देवीं लुब्ध झालों पाहा सांई हृदयीं हो ॥ ध्रु० ॥ हृदयीं तूं सदा माझ्या भरलासी सांइ हो । निरिक्षीतां तूज सांई क्षण पल पल दिससि हो ॥ प्रि० ॥ १ ॥ लडिवाळ ऐक माझे त्वचरणा चुरिन हो । याहूनी काय माझ्या आहे या हातिं हो ॥ प्रि० ॥ २ ॥ लक्षिन मी मार्ग तूझा चातकवत् सांइ हो । गुरु कृष्णा आर्त पुरवीं । याजन्मीं हीच हो ॥ प्रि० ॥ ३ ॥

पदः—जाते की मम शकुंतला० या चालिवर.

भेटसि कधिं तूं सांई बाबा मज या मोहमयीं । त्वत्तनुकांती अवलोकाया आस सदा हृदयीं ॥ ध्रु० ॥ जरि मी तूझा असें दयाळा । तरि धांवुनि येईं । क्षणभरितरि तव तनु दावी रे । येउनियां समयीं ॥ भे० ॥ १ ॥ भक्तकाम कल्पद्रुम तुम्हां वदति

ठायिं ठायीं । भेद अभेदा रहित तुम्हां ना रावरंक कांहीं ॥ भे० ॥ २ ॥ साच असे ग्रह एकवार तुज बघण्या त्या कायीं । येईं धांउनि या मोहमयीं कृष्णदास अन्वयीं ॥भे० ॥ ३ ॥

पदः—सुखकर फर साधूचा संग० या चालीवर.

धरिसि जरी सांइ चरणि विश्वास ॥ धृ० ॥

मायामय भवसागर तरुनी । मुरसिल तत्पदीं खास ॥ ध० ॥ १ ॥
निदिध्यास अनुदिनी धरिसि जरी । पावसि ब्रम्हपदास ॥ ध० ॥ २ ॥
सांई अनुभव दुर्लभ बापा । जा बघ त्या वंशास ॥ ध० ॥ ३ ॥
धांवत धांवत जा जा झडकरीं । घट्ट धरीं चरणास ॥ ध० ॥ ४ ॥
उत्तम हा नरजन्म नराचा । व्यर्थ नको करूं त्यास ॥ ध० ॥ ५ ॥
कृष्ण कृपान्वित कृष्ण दीनाच्या । दवडुं नको वचनास ॥ ध० ॥ ६ ॥

पदः—प्रभु अखंडसुखमय रामचि हा० या श्रीसद्गुरु बांदकर महाराजांच्या पदाच्या चालीवर.

प्रिय सांइ स्वसुख पद सोडुं नका । नका भुलं आप्त सुत धन कनका ॥ धृ० ॥ सांइ चरण करी हरण पापनिधि । लक्षिं धरीं ही खूण । त्यजुनि विकल्पा जाया । सांइ करीं आप्त सखा ॥ ॥ प्रि० ॥ १ ॥ सांइ संत महंत नरारे । घे अनुभवें तूं प्रचित । हो येथें सावचित । मोहूं नको या मामा काका ॥ प्रि० ॥ २ ॥ दक्ष होउनि पदीं लक्ष लावितां । मोक्ष तूज प्रत्यक्ष । साक्षि ठेविं तूं अक्ष । नको करूं वैखरी तूं ही फुका ॥ प्रि० ॥ ३ ॥

साकी.

अंतर माझें जरि तवचरणीं मत्प्रिय सांई नाथा ।
एकवार तरी येउनि येथें भेट देईं अनाथा ।
अंतरसाक्षी तूं । मग का येसि न धांवुनि तूं ॥ १ ॥

अनुष्टुप.

लक्षकोटी दोष माझे सांईबापा क्षमाकरीं ।
दास मी विनवी तूझा जोडुनी उभया करीं ॥ १ ॥

श्रीसमर्थ सांईबाबा चरणार्पणमस्तु

अनुष्टुप.

मी माझें लिहिणें नाहीं दयाळा कृष्ण सद्गुरु ।
वदता वदवीता तूं कृष्ण हा तव किंकरू ॥ १ ॥

## अनुभव.

सदरील कविता शिर्डी मुक्कामीं पाठविल्या त्याचें उत्तर श्रीसांईबाबानी पाठविलें, हें उत्तर त्यांच्या एका भक्ताच्या हातांतून पाठविलें होतें. परंतु त्यांजकडून मला तें मिळालें नाहीं याबद्दल मला परम वाईट वाटलें. त्या पत्रांत " मी तुम्हांकडेसच आहे. " वगैरे मजकूर होता असें मागाहून कै. वा. दीक्षीत यांचा कारकून वै. वा. रेडकर यांजकडून कळून आलें. ह्या वेळीं खालील स्वप्न झालें.

" श्रीसमर्थ वाग्देव महाराज व श्रीसमर्थ सांईबाबा महाराज आमचे घरीं (निकदवरी गल्लींत ) झोंज्यासन्मुख बसले आहेत. श्रीसांईबाबानीं आपले दोन्ही पायाचीं पाउलें जमीनीस टेकून दोन्ही गुडघ्यांवर हात ठेवलें होतें. मी बाहेरून घरांत पाय ठेवतांच श्रीसमर्थ वाग्देव महाराज श्रीसांईबाबा महाराजांस बोलले, " हा बघ थळी आला." व मला बोलले " थळी ह्यांस नमस्कार कर " मी श्रीसांईबाबांस नमस्कार करावयास गेलों तों त्यांनीं आपलें पाय जरा मागें खेंचले व दोन्ही हात माझ्या तोंडासमोर नेऊन आपली जीभ किंचित् बाहेर काढून " हें काय ? हें काय? " असें चकित मुद्रेनें म्हणाले. नंतर मी त्यांस परत नमस्कार करावयास गेलों त्यावेळीं पाय पुढें करून प्रेमानें नमस्कार करावयास दिला. मी त्यांच्या पूज्यचरणीं मस्तक ठेवुन नमस्कार केला. हें स्वप्न रात्रौ दोन वाजतां झालें. श्रीसमर्थ वाग्देव महाराज झोंपले होते मी श्रीसमर्थांस देवा ! म्हणून हांक मारतांच मला बोलले, " थळी काय ? " तेव्हां झालेलें स्वप्न मी श्रीसमर्थांस सांगितलें. श्रीसमर्थ बोलले, " तूं त्यास कधीं पाहिलें होतें काय ? " देवा ! मला त्यांस पाहण्याची तीव्र उत्कंठा झाली होती. आणि आठ दिवसांपूर्वी कांहीं कविता करून पाठविल्या होत्या तेव्हां श्रीसमर्थ बोलले, " म्हणूनच मी तुला त्याचें दर्शन देवविलें आहे. " ही कृति परमदयाघन श्रीसमर्थ भगवान् वाग्देव महाराजांचीच निःसंशय होय.

समस्त संतभक्तांची चरणधूळ,
कृष्ण जगन्नाथ थळी.

# श्रीसाईनाथ ट्रेडिंग कंपनी
## सुगंधी सामानांचा कारखाना.

प्रोप्रायटर—व्ही. जी. देशपांडे,

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर.

खालील जिन्नसा वरील पत्यावर मिळतील.

*   *

आमचे कारखान्यांत शास्त्रोक्त बनविलेलीं सुवासिक तेलें, सर्व तऱ्हेची टूथ पावडर, सर्व प्रकारच्या सुगंधी उदबत्त्या, पुष्पगंधा व मधूमालती व गुलकंद.

---

**For Madras & other books about Shri Sai Baba and Shirdi Guide or coloured Pictures**

of Baba or Krishnna Datta Marutiadi Roopa Sai and silver & gold lockets in different sizes issued in Madras write to the clerk, Shirdi Sansthan, Post Rahata Dt: Ahamednagar or to :—

[1] R. Vanchinathan, 30, N. V. Chetty street, Triplicane, Madras [for the coloured Pictures & lockets]

to:---

[2] Shri Thirupurasundari Jewellory 531, Pyerofts Road, Triplicane, Madras [ for the lockets only ]

For Gujarathi:—

" Guru Smriti, " " Manache Shloka " "& Hari Path " write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira:

For Coloured pictures of the oil painting of Sai Baba in the mosque write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle.

**For Authentic Photos of Sai Baba:—**

write to Mr. R. V. Ghaisas, Editor Sailila. Dadar. (sizes available card, cabinet, little bigger and bigger enlargement.)

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to–Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14.


छातीचे विकारांवर

सांडू ब्रदर्स यांचें

हार्टिना

Regd.

(HEARTINA)

HEARTINA

Excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखें वाटणें, छातींत घबराट होणें, फुफ्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

बा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)

सविस्तर माहिती साठीं लिहाः—

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लि.

आर्यौषधि कारखाना.

चेंबूर—मुंबई.


सूचनाः—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.
रामचंद्र वासुदेव घैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखलेरोड नॉर्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R.V. Ghaisas-Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North, Dadar, Bombay 14